**प्रसिध्दी पत्रक** **दिनांक** 20/11/2025

**आरोपी** - नवनाथ मच्छिन्द्र कोकाटे धंदा- शेती रा. पिंपळगाव (खंडाळा) ता.वैजापूर,छत्रपती संभाजीनगर यांनी तक्रारदार यांच्या कडुन 10,000/- (दहा हजार रुपये) लाच स्विकारल्याने आरोपी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर यांच्या जाळ्यात.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | छत्रपती संभाजीनगर |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | पोलीस ठाणे शिऊर, ता.वैजापुर, छत्रपती संभाजीनगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया सुरु आहे. |
| आरोपीचे नाव व पत्ता | नवनाथ मच्छिन्द्र कोकाटे वय 30 वर्ष, धंदा- शेती रा. पिंपळगाव (खंडाळा) ता.वैजापूर,छत्रपती संभाजीनगर. (खाजगी इसम) |
| लाच मागणी रक्कम | 20,000/- (विस हजार रुपये) |
| लाच स्विकृती रक्कम | 10,000/- (दहा हजार रुपये) |
| तपास अधिकारी<br>सापळा अधिकारी | श्री. संतोष तिगोटो, पोलीस निरिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर<br>श्री. योगेश शिंदे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर |
| लाच मागण्याचा हेतु | यातील तक्रारदार यांचे वडीलांना मारहान झाल्याने त्यांना अटॅक येऊन मयत झाले होते व त्यांचे मृत्यू संदर्भात शिऊर पोलीस स्टेशन येथे तक्रार अर्ज दिला होता तसेच अर्जदार यांना सदर तक्रार अर्जातील गैरअर्जदार यांनी फोनद्वारे शिवीगाळ करून एट्रासिटीचा गुन्हा दाखल करण्याची धमकी दिली होती त्या अनुषंगाने तक्रारदार यांनी दिनांक 11/11/2025 रोजी शिऊर पोलीस स्टेशन येथे तक्रारी अर्ज दाखल केला होता.<br>सदर दोन्ही तक्रार अर्जामध्ये तक्रारदार यांच्या बाजूने अर्ज चौकशी करून मदत करून देण्यासाठी खाजगी इसम नवनाथ कोकाटे यांनी तक्रारदार यांना 20000 हजार रुपये द्यावे लागतील तेव्हा ते बिट अंमलदार यांचेकडून काम करून घेईल असे बोलून 20000 हजार रुपये लाचेची मागणी केली होती परंतु तक्रारदार यांना लाच रक्कम द्यायची इच्छा नसल्याने त्यांनी दिनांक 19/11/2025 रोजी ला.प्र.वि. कार्यालय छत्रपती संभाजीनगर येथे तक्रार नोंदवली. |
| थोडक्यात माहिती | तक्रारदार यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक 19/11/2025 रोजी पंचासमक्ष लाच मागणी पडताळणी कार्यवाही आजमावली असता खाजगी इसम यांनी तक्रारदार यांनी दिलेल्या अर्जा सबंधीत मदत करून देण्यासाठी लोकसेवकाच्या नावाचा प्रभाव पाडून स्वतःकरिता 20,000/ रुपये लाचेची मागणी करून स्वीकारण्याचे मान्य केले.<br>खाजगी इसम यांच्या लाच मागणी नंतर दिनांक 19/11/2025 रोजी शासकीय पंच समक्ष सापळा कार्यवाही दरम्यान खाजगी इसम कोकाटे यांनी तक्रारदार यांच्याकडून मागणी केलेल्या लाच रकमेपैकी 10000/- रुपये लाचेची रक्कम पंच साक्षीदारा समक्ष स्वीकारली व स्वीकारल्यानंतर पंचा समक्ष त्यास सापळा पथकाने ताब्यात घेतले.<br>आरोपी नवनाथ मच्छिन्द्र कोकाट यांच्या विरुध्द पोलीस ठाणे शिऊर, ता.वैजापुर, छत्रपती संभाजीनगर येथे गु.र.नं.346/2025 कलम 7 अ, भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम-1988 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नमुद गुन्हयाचा तपास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीगनर मार्फत करण्यात येत आहे. |

सदर कार्यवाही पोलीस अधीक्षक श्रीमती माधुरी केदार कांगणे, अपर पोलीस अधीक्षक श्री.शशिकांत सिंगारे, पोलीस उप अधीक्षक श्री.राजीव तळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी पोलीस निरिक्षक, श्री.योगेश शिंदे यांनी केली आहे. त्यांना सदर कार्यवाही कामी पोलीस निरीक्षक श्री.संतोष तिगोटे, पोह/ राजेंद्र सिनकर, पोअ/ प्रकाश डोंगरदिवे, चालक/ रामेश्वर ताठे ला. प्र. वि. छत्रपती संभाजीनगर यांनी मदत केली. लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा.

संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जुना बाजार, छत्रपती संभाजीनगर

ई- मेल :-1)spacbaurangabad@mahapolice.gov.in 2) dysp.acbcsn@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net संपर्क क्रं. :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064,

पोलीस अधीक्षक :- 90110 92777 अपर पोलीस अधीक्षक :- 9923102205

पोलीस उप अधीक्षक :- 9923247986 व्हॉट्सअप क्रमांक :- 7720891064

(राजीव आ.तळेकर)
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
छत्रपती संभाजीनगर